# महफिल-ए-प्रशांत ३

àemV XmSH a

- साहीर लुधीयान्वी
- शकील बदायुनी
- हसरत जयपुरी
- शैलेंद्र
- गुलजार
- मजरुह सुलतानपुरी
- राजेंद्र कृष्ण



# महफ़िल - ए - प्रशांत ३

लेखन - प्रशांत दांडेकर.

9821947457

prashant.dandekar@rediffmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ , मांडणी आणि संपादन : सचिन काकडे

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity
eastern express highway
Thane, 400604

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan®2015

# ഇ प्रस्तावना ഋ

गीत (शब्द) श्रेष्ठ की संगीत श्रेष्ठ हा वाद कित्येक दशकांपासून चालत आलेला आहे. पण हे पण तितकेच खरे आहे की संगीत या शब्दामध्ये गीत देखील दडलेले असल्याने आपण एवढेच म्हणू शकतो कि संगीतकार व गीतकार म्हणजे प्रियकर प्रेयसीची जोडी आहे. दोघेही एकमेकांशिवाय अपूर्ण व दोघेही एकत्र असले कि जन्नत की सैर!

मेहफिल च्या आधीच्या दोन भागांमध्ये आपण संगीतकारांबद्दल वाचले, आता मेहफिल - ए - प्रशांत च्या तिसऱ्या भागामध्ये आपण गीतकारांबद्दल ऐकणार आहोत. 'गीतकार संगीतकारापेक्षा श्रेष्ठ असतो म्हणून मी नेहमीच एक रुपया मानधन जास्त घेणार' असे ठणकावून सांगणारे साहीर लुधियानवी म्हणजे गीतकार समुदायाचे नाक होते.

'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है' असे गद्य वाटणारे पद्य लिहिणारे गुलझार म्हणजे संगीतकारांना खुले आव्हान देणारे पहिलवानच जणू!

हे गीतकार म्हणजे एक अजब रसायनच असतं ! कुणाला बस मध्ये समोर बसलेल्या तरुणीकडे पाहून गीत सुचते तर कुणाला आपल्या पूर्व प्रेयसीला तिच्या नवऱ्यासोबत बघून. प्रतिभा फुलायला या गीतकारांना कोणताही प्रसंग उपयोगी पडतो; अगदी स्वतः ला जास्त दारू चढल्यावर इतरांनी आपली यथेच्छ चेष्टा केल्यावर सुद्धा. हे गीतकार कधी, आधीच दिलेल्या संगीतानुसार शब्द पेरण्यात पारंगत होते तर कधी संगीतासाठी माझे शब्द बदलणार नाही असे ठणकावून सांगणारे होते

रसिकांना शब्दांचे इंद्रधनू दाखविणारे हे अवलिया गीतकार अंतर्बाह्य कसे होते हे दाखविण्याचा इथे प्रांजळ प्रयत्न करण्यात आलेला आहे.

शैलेंद्र, त्यांना मनापासून मानणारे गुलझार, राज चे आवडते हसरत जयपुरी, नौशाद बरोबर जोडी जमलेले शकील बदायुनी असे अनेक गीतकार या मैफिलीमध्ये आपली आतुरतेने वाट बघत आहेत  इन्दिवर, कैफी आझमी, आनंद बक्षी हे गीतकार या तिसऱ्या भागात नसले तरी त्यांच्या सोबत आपली मैफिल भविष्यात नक्कीच रंगणार आहे; तेव्हा काळजी नसावी.

मात्र आपली फ़र्माईश सर आंखोंपर. हे पुस्तक कसं वाटलं ते कळवा. पुढच्या भागात काय हवं तेही सांगा. काही राहून गेलं असल्यास संकोच न करता तेही दाखवून द्या.

आखिर ये महफ़िल है. एकतर्फ़ी भाषण नाही.

## ओ जानेवाले हो सके तो लौटके आना



शैलेंद्र एक सिद्धहस्त गीतकार होते.

खरे तर गुलजार स्वतः एक प्रतिभावान गीतकार आहेत. पण त्यांच्याच शब्दांमध्ये शैलेंद्र यांची थोरवी इथे नमूद करावीशी वाटते. 'शैलेंद्र यांच्या सारखा मोठा गीतकार असूच शकत नाही. त्यांचे कोणते ही गाणे घ्या. ते खरवडून काढले तर शब्दांच्या पापुद्र्याखालती एक नवीन अर्थ सापडेल. एकाच गीतामध्ये लपलेले अनेक गहिरे अर्थ हे शैलेंद्र यांचे वैशिष्ट्य होते.'

पण कोळशाच्या खाणीतून बाहेर काढून या हिऱ्याला पैलू पाडण्याचे श्रेय मात्र जाते ते राज कपूर यांना. शैलेंद्र हे परेल रेल्वे वर्क शॉप मध्ये काम करायचे. एकदा वर्क शॉप मधील सत्यनारायणाच्या पूजेसाठी पृथ्वीराज कपूर यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण होते. तेव्हा त्यांच्याबरोबर राज कपूर देखील आले होते. कार्यक्रमात शैलेंद्र यांची अर्थपूर्ण कविता ऐकून त्याचक्षणी राज कपूर यांनी त्यांना सिनेमासाठी गाणी लिहिण्याची ऑफर दिली. शैलेंद्र यांनी राज यांचे व्हिजिटिंग कार्ड ठेवून घेतले पण ऑफर मात्र नाकारली. पण काही काळानंतर शैलेंद्र आर्थिक तंगी मध्ये सापडले तेव्हा त्यांना राजच्या कार्ड ची आठवण झाली ते राजकपूर यांच्याकडे गेले. गाण्यांच्या बदल्यात पैसे द्या अशी विनंती त्यांनी राज यांना केली. पण तेव्हा बरसात ची सर्व गाणी लिहून झाली होती म्हणून राज ने त्यांना गाण्यांचे मग बघू तुम्ही पैसे मात्र आता घेऊन जा असे सांगितले. पण शैलेंद्र मानी होते ते म्हणाले, 'मला उधार नको कामाचा मोबदला द्या'. राज यांनी मग हसरत जयपुरी यांनी लिहिलेली बरसात ची दोन गाणी बदलण्याचा निर्णय घेतला. शैलेंद्र यांच्याकडून त्यांनी दोन नवीन गाणी लिहून घेतली; पहिले होते,' बरसात में हमसे मिले तुम सनम, तुमसे मिले हम' व दुसरे होते 'पतली कमर है तिरछी नज़र है'

शैलेंद्र यांनी **'दाग'** चित्रपटाची गाणी लिहिली आहेत. त्या संदर्भातला एक गंमतीदार किस्सा इथे नमूद करावासा वाटतो. शंकर जयकिशन यांचे संगीत या चित्रपटाला आहे. काही कारणाने दिल्या गेलेल्या चालीवर शैलेंद्र यांना गाण्याचे बोल सुचतच नव्हते. शेवटी वैतागून ते दत्ताराम (शंकर-जयकिशन यांचे 'अरेंजर'व वादक) यांना म्हणाले, "चल जरा बाहेर फ्रेश हवेत फिरून येवूया. खुल्या हवेत माझ्या डोक्यात काहीतरी कल्पना नक्कीच येईल". दोघे ही मग हँगिंग गार्डनला आले.  शैलेंद्र यांनी एक सिगारेट शिलगावली. सिगारेट संपली आणि अचानक शैलेंद्र यांना गाण्याच्या ओळी सुचल्या. ओळ होती..'ए मेरे दिल कहीं  और चल, गम की दुनियासे दिल भर गया' पण पंचाईत अशी होती की लिहायला जवळ पेनच नव्हते. पण डोक्यातील ओळ निसटून जाऊ नये म्हणून मग काडेपेटीच्या गन्धकाने व विझलेल्या सिगारेटच्या थोटकानेच शैलेंद्र यांनी कागदावर ओळी खरडल्या.



दत्ताराम व शैलेंद्र यांच्या मुळे जन्माला आलेले अजून एक गाणे म्हणजे 'मूड मुडके ना देख'. त्याचे असे झाले की श्री ४२० च्या रेकोर्डिंग च्या दरम्यान शंकर, जयकिशन, शैलेंद्र व दत्ताराम कार मधून आर के स्टुडियो ला जात होते.शैलेंद्र व दत्ताराम मागच्या सीट वर बसले होते. मुंबईमध्ये नुकत्याच गगनचुंबी इमारती उभ्या राहत होत्या. त्यातीलच एक बिल्डींग दत्ताराम मान मागे वळवून पुन्हा पुन्हा न्याहाळत होते. ते पाहून शैलेंद्र म्हणाले,"मूड मुडके क्या देख रहे हो" त्यावर दत्ताराम म्हणाले," मुंबईची प्रगती बघत आहे". हा संवाद ऐकून शंकर म्हणाले की मूड मुडके वरून एक छान गाणे होऊ शकेल. शैलेंद्र यांचे विचारचक्र लगेच सुरु झाले. राज कपूर यांच्या कडे पोहचेपर्यंत शैलेंद्र यांचे गाणे तयार होते, 'मूड के ना देख मूड मूड के, जिंदगानी के सफर में तू अकेला ही नहीं है हम भी तेरे हमसफ़र हैं'

असेच काहीसे **श्री ४२०** च्या गाण्यांच्या वेळी देखील झाले. राज कपूर आपल्या चौकडीला म्हणजे शंकर, जयकिशन, हसरत जयपुरी व शैलेंद्र यांना घेऊन खंडाळ्याला आले होते. चित्रपटामधील डान्स सिच्युएशन साठी शंकर जयकिशन यांना एक धमाल गाणे हवे होते. शंकर यांना 'रमैय्या वस्तावैय्या' एवढेच काही तरी बोल आठवत होते. पुढचे काही सुचतच नव्हते. तेव्हा शैलेंद्र एकदम म्हणून गेले,"मैंने दिल तुझको दिया" आणी अशा प्रकारे एका मस्त गाण्याचा जन्म झाला

मधुमती चित्रपटामधील 'जंगल में मोर नाचा किसीने न देखा हम जो थोड़ी सी पी के ज़रा झूमें हाय रे सबने देखा' या गाण्यामागे देखील एक मजेशीर किस्सा आहे. एकदा शैलेंद्र हेमंत दा यांच्याकडे गेले होते. तिथे ते जरा जास्तच प्यायले व थोडे वाह्यात वागू लागले तेव्हा हेमंत दा यांच्या सात मेव्हण्यांनी शैलेंद्र यांची चेष्टा केली. शैलेंद्र यांना त्या परिस्थितीमध्ये सुद्धा हे वरील मजेशीर बोल सुचले

जेव्हा कॉलेज गर्ल साठी आपल्या जिवलग मित्रांनी म्हणजे शंकर जयकिशन यांनी राजेंद्रकृष्ण यांना साईन केले तेव्हा शैलेंद्र भलतेच नाराज झाले त्यांनी शंकर यांना एक उपरोधिक चिठ्ठी पाठवली; त्यात लिहिले होते,"छोटी सी ये दुनिया, पहचाने रास्ते हैं तुम कहीं तो मिलोगे तो पूछेंगे हाल..". ह्याच ओळीवरून सुरु झालेले गाणे मग रंगोली या चित्रपटामध्ये मग वापरण्यात आले.

शैलेंद्र यांना नेहमीच खरे बोलायला आवडायचे. शंकर जयकिशन यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या याच खरेपणामुळे गाण्याच्या बोलांसंदर्भात त्यांचे व शैलेंद्र यांचे खुपदा खटके उडायचे. शैलेंद्र जितके सच्चे होते तितकेच पापभिरू देखील! त्याच मुळे तिसरी कसम चित्रपटाच्या वेळी शैलेंद्र सहजच लिहून गेले, "सजन रे झूट मत बोलो खुदाके पास जाना है"

साहित्य प्रतिष्ठान®

खरे तर शैलेंद्र आपल्या प्रत्येक गाण्याची सुरुवात करण्यापूर्वी देवाचे नाव आवर्जून घ्यायचे. पण आपल्या मुलीच्या मृत्यूमुळे ते देवावर कायमचे रुसले. त्यांनी देवाला आठवणे सोडून दिले. तरीदेखील एकापेक्षा एक सुरेल भजने त्यांच्या लेखणीमधून उतरली. जशी कि, 'दुनिया ना भाए मोहे अब तो बुलाले', 'ना मै धन चाहू न में रतन चाहू तेरे चरणों की धुल मिल जाए'

‘सब कुछ सीखा हमने, न सीखी होशियारी’या त्यांच्या सादगी वरच रसिक बेहद्द खुश असायचे म्हणूनच त्यांना मानाचे फिल्मफेअर या गाण्यासाठी मिळाले

शैलेंद्र स्वतः डफली फार सुरेख वाजवायचे. राज कपूर यांना डफली धरायला व वाजवायला शैलेंद्र यांनीच शिकविले होते.

'तिसरी कसम';शैलेंद्र यांनी निर्माता म्हणून केलेला हा चित्रपट आर्थिक दृष्ट्या फ्लॉप गेला. खरे तर ह्या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला. पण हे यश अनुभवण्यापूर्वीच शैलेंद्र यांनी आयुष्यातील अकाली एक्झिट घेतली. 'तिसरी कसम' चे अपयश ते पचवू शकले नव्हते, त्या नैराश्यातच त्यांचा अंत झाला. मेरा नाम जोकर या चित्रपटामधील प्रसिद्ध गाणे, 'जीना यहाँ मरना यहाँ' हे खरे तर शैलेंद्र लिहिणार होते पण त्यांच्या अकस्मात जाण्यामुळे ते गाणे त्यांच्या पुत्राने म्हणजे शैली शैलेंद्र यांनी पूर्ण केले.




३० ऑगस्ट शैलेंद्र यांचा जन्म दिवस असतो. रसिक शैलेंद्र यांना पुनर्जन्माची विनंती करताना जणू म्हणतात, "ओ जानेवाले हो सके तो लौटके आना"

# 'मुसाफिर हु यारो, मुझे चलते जाना है, बस .... चलते जाना है'



आयुष्यात असे खास क्षण कधी तरीच येतात जेव्हा पुरस्कार स्विकारणाऱ्या व्यक्तीच्या भाग्यापेक्षा त्या पुरस्काराचेच भाग्य थोर म्हणून गणले जाते. चतुरस्त्र प्रतिभेच्या, आपल्या सर्वांच्या लाडक्या गुलजार साहेबांना मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्कारामुळे गुलजारांचा जसा गौरव झाला आहे तसाच खुद्द या पुरस्काराचाही झाला आहे

प्रतिभावान कवी, पटकथा लेखक आणि दिग्दर्शक संपूरण सिंग कालरा सर्वश्रृत आहेत ते त्यांच्या गुलझार या नावामुळे

गुलजार म्हटले कि माझ्या डोळ्यांपुढे एक देवीसारखे आठ भुजांचे काल्पनिक व्यक्तिमत्व उभे राहते. एका हाताने गीत लेखन , दुसऱ्याने कविता व शेरोशायरी, तिसऱ्या हाताने सवांद लेखन, व चौथ्या हाताने पटकथा लेखन करणारे हे व्यक्तिमत्व उरलेल्या हातांनी चित्रपट दिग्दर्शन व संगीत दिग्दर्शनासाठी सांकेतिक हातवारे करत आहे असे मजेदार चित्र त्यांचे अष्टपैलुत्व सिद्ध करायला पुरेसे आहे . बरे हे सर्व करताना गुलजार साहेबांचे एक ना धड भाराभर चिंध्या असे होत नसून प्रत्येक काम हे एक अजरामर कलाकृती होते हे पाहून आपली मात्र दहाही बोटे तोंडात जातात ती वेगळीच

'कोशिश' सारखी सुरेख कोशिश केल्याबद्दल सर्वोत्तम पटकथेचा राष्ट्रीय पुरस्कार, 'मौसम' साठी सर्वोत्तम दिग्दर्शनाचा राष्ट्रीय पुरस्कार , व ' इजाजत ' साठी सर्वोत्तम गीतकाराचा राष्ट्रीय पुरस्कार. हे म्हणजे तिन्ही

लोकांमध्ये झेंडा रोवण्यासारखेच नाही का ! आणि हो आयसिंग ऑन  केक म्हणजे 'जय हो' गाण्यासाठीचा ऑस्कर पुरस्कार. या सर्व दिग्विजयापुढे फिल्मफेअर चे  संवाद लेखनाचे तीन पुरस्कार  (आनंद , नामक हराम व माचिस) झाकोळून जातात ते वेगळेच

फाळणीचे चटके सोसावे लागले तरी तुम्ही इतके सुंदर, हळुवार  गीत व संगीत कसे काय  देऊ शकलात यावर गुलजार यांचे उत्तर फार मार्मिक असते . साखर झोपेतून आपल्याला जागच मुळी  आजीच्या गेयता असलेल्या श्लोकांमुळे यायची. त्या नंतर दुधाचा रतीब घालायला येणारा गवळी पण मस्त पैकी सुरेल शीळ घालत यायचा. त्या नंतर पाळी असायची तो कामाचा राम रगाडा गाणे गुणगुणत कामे उरकणाऱ्या आईची. त्यात भर पडायची भजने म्हणत भिक्षा मागणाऱ्या फकीराची. इतके सुरेल संस्कार झाल्यावर अजून काय हवे ?



कवी, गीतकार यांबरोबर एक संवेदनशील दिग्दर्शक म्हणून गुलजार यांचे हिंदी चित्रपटसृष्टीतील स्थान मोलाचे आहे. यांच्या सुरेल प्रवासाची सुरुवात झाली ते बिमलदा यांच्या बंदिनी पासून . 'मोरा गोरा रंग लईले' हे त्यांचे पहिले सुरेल अपत्य होते. पण बंदिनी आधीच काबुलीवाला रिलीज झाल्याने ऐ मेरे प्यारे वतन और गंगा आये कहां हि गाणी आधी लोकप्रिय झाली. चंद्राला छळणाऱ्या राहूचे; अस्सल भारतीय संस्कृतीचे रूपक त्यांनी 'मोरा गोरा अंग' मध्ये वापरून आपली नाळ भारतीय मातीशी  कायमच जुळलेली राहील याची ग्वाही दिली.

या हळव्या माणसाला एकाच चंद्रामध्ये वेगवेगळ्या भावना दिसल्या. कधीतरी  त्यांना तो  प्रियकराला चोरून भेटायला जाणाऱ्या प्रेयसीची चोरी पकडणारा खट्याळ वीर वाटला तर कधी तो निळ्या नदीतून प्रगट होणारा गिला चांद वाटला. एकच चंद्र, दोन वेगवेगळ्या व्यक्तिरेखांना  एकाचवेळी कसा वाटू शकतो हे दाखविण्यासाठी त्यांच्या या ओळी वाचून पहा ...

"मां ने जिस चांद सी दुल्हन की दुआ दी थी मुझे,

आज की रात वह फ़ुटपाथ से देखा मैंने,

रात भर रोटी नज़र आया है वो चांद मुझे!"

प्रत्येकाच्याच जीवनामध्ये कभी ख़ुशी कभी गम अशी अवस्था अवस्था असते; माणसाच्या काही स्वप्नांची पूर्ती होते तर त्याची काही स्वप्न भंग पावतात . गुलजार साहेब पण याला अपवाद कसे असतील म्हणूनच मी स्वप्नांचे विखुरलेले तुकडे गोळा करणारा 'कबाडी जिंदगी का' आहे असे ते गर्वाने सांगतात. मग यातूनच 'मेरा कुछ सामान तुम्हारे पास' सारखे गाणे जन्माला येते

गुलजार यांच्या कट्टर चाहत्याचे एक खूप मार्मिक वाक्य आहे ... गुलजार साहेबांकडे छान लयीत मुरवत घातलेल्या शब्दांची एक बरणी असली पाहिजे, त्यामुळे त्यांचे सगळेच शब्द कसे गाण्याच्या धून मध्ये विरघळुन जातात. हे वर्णन किती तंतोतंत लागू पडते यासाठी आपल्याला गाणी शोधायची गरजच पडत नाही कारण 'फिर वो हि रात', "ए जिंदगी गले लगा ले, अशी अनेक गाणी सकाळ संध्याकाळ आपली सुरमयी सोबत करत असतात



मराठी पुरते बोलायचे झाल्यास गुलजार साहेबांना कुसुमाग्रजांची भुरळ पडली होती

म्हणूनच त्यांनी कुसुमाग्रजांच्या एक दोन नव्हे तर तब्बल १०० कवितांचे अनुवाद केले. ग दि मा बद्दल गुलजार म्हणतात कि गदिमा म्हटले कि मला आईच्या गोदीची आठवण येते कारण गदिमांचे शब्द म्हणजे आईचे प्रेम, ऊब, कळवळा सर्व काही आहे. एक प्रतिभावंतच दुसऱ्या प्रतिभावंताची कदर अशा प्रकारे करू शकतो

गदिमा - सुधीर फडके या प्रमाणेच हिंदी मध्ये जोडी जमली ती गुलजार व पंचमदा यांची ... घर, इजाजत , मासूम हि त्या जोडीची सुरेल कामगिरी. जेव्हा दिग्दर्शनाची वेळ आली तेव्हा गुलजार व संजीव कुमार यांची जोडी घट्ट जमली . कोशिश, आंधी, मौसम, अंगूर ही चित्रपटांची नुसती नावे नसून या दोघांनी उभी केलेली अभिनयाची शाळाच आहे



जितेंद्र सारख्या जम्पिंग हिरोला पण परिस स्पर्श झाला तो गुलजार साहेबांच्या रूपातच. किनारा, खुशबू, परिचय मधील जितेंद्र हा फक्त गुलजार साहेबांचाच मानसपुत्र असू शकतो.

गुलजार हे खरोखर मनाने इतके तरुण आहेत कि त्यांच्याच शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास 'दिल तो बच्चा है जी' अशीच नेहमी त्यांची अवस्था असते म्हणूनच लहान मुलाप्रमाणे त्यांना कोणत्याही गोष्टीमध्ये कसला हि भास होतो. एखादा भकास, उदास दिवस त्यांना खाली बर्तन वाटतो तर रात्र एक अंधा कुंआ. लहान बालकाप्रमाणेच ते बंडखोर स्वभावाचे असल्याने विवाह बाह्य संबंधावर आधारित लिबास नावाचा चित्रपट ते बनवू शकले. पण तो विषय त्या काळात इतका स्फोटक होता कि तो चित्रपट कधी प्रदर्शितच होऊ शकला नाही

गुलजार म्हणजे आउट ऑफ बॉक्स थिंकिंग करणारे अवलिया आहेत. त्यांचे मेरे कुछ समान हे शब्द ऐकल्यावर राहूल बर्मन इतके वैतागले कि ते गुलजार साहेबांना म्हणाले कि उद्या तू मला वर्तमान पत्रातील एखाद्या

बातमीला चाल लावायला शिकवशील. पण पंचम ने या शब्दांवरच  कमालीची ट्यून बनविली. शब्द व सुरांसाठी गुलजार व आशाजींना पुरस्कार मिळाला पण पंचम ला मिळाला नाही. याचे गुलजार साहेबाना शेवट पर्यंत वैषम्य वाटत राहिले  'तुझसे नाराज नही जिंदगी' असे म्हणत आपले गुलजार साहेब 'मुसाफिर हु यारो, ना  घर है ना ठिकाना, मुझे चलते  जाना है, बस .... चलते  जाना है' म्हणत सुरेल वाटेवर चालतच आहेत व आम्ही रसिक मात्र त्यांच्या मागोमाग आपसूकच ओढले जात आहोत. दादा साहेब फाळके पुरस्कार हा एक मैलाचा दगड तर पार झाला आता पुढची स्वरांची मैफिल जमेल भारतरत्न या मुक्कामावर अशीच प्रार्थना माझ्या सारखे गुलजार साहेबांचे रसिक करत असतील यात शंकाच नाही



## 'याद में तेरी जाग जाग के हम रातभर करवटें बदलते हैं'

फिल्मफ़ेअर च्या आता पर्यंतच्या पुरस्कार यादीवर नजर टाकली असता रसिकांना खूप रोचक माहिती मिळू शकते जसे की उत्कृष्ट गीतकारासाठी, गुलजार साहेबांना सर्वाधिक वेळा पुरस्कार मिळाला आहे तर सर्वाधिक नामांकनाचा मान आनंद बक्षी यांच्या कडे जातो. एकाच वर्षी सर्वाधिक मानांकने म्हणजे सर्वच्या सर्व पाच, जावेद अख्तर यांना मिळाली होती. असाच एक आगळा वेगळा रेकोर्ड म्हणजे पुरस्कारांची हॅट-ट्रिक करण्याचा मान गीतकार शकील बदायुनी यांच्या कडे जातो, जो आज हि अबाधित आहे. आज आपण वाचणार आहोत याच गुणी गीतकाराच्या काही सुरेल आठवणी



'हुस्न', 'प्यार' यांच्यावर शायरी करण्यात व गीते लिहिण्यामध्ये शकीलजी यांचा हातखंडा होता. सौंदर्य हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळेच ते, **'**मेरे मेहबूब तुझे मेरे मोहब्बत की कसम**'**, 'जब जाग उठे अरमान तो कैसे नींद आये'**,** 'जरा नजरोंसे कह्दो जी निशाना चूक ना जाये**'** या सारखी सौंदर्याचे गुणगान करणारी गाणी सहज लिहून जायचे. आधी सांगितल्याप्रमाणे शकील बदायुनी यांनी तीनवेळा सतत फिल्म फ़ेअर पुरस्कार जिंकला होता; वर्षे होती १९६१ ते १९६३. 'चौदहवी का चांद हो'**,** 'हुस्न वाले तेरा जवाब नहीं' **(घराना),** 'कहीं दीप जले कहीं दिल**'** **(बीस साल बाद)** या गाण्यांसाठी त्यांना पुरस्कृत करण्यात आले होते.

या गुणी गीतकाराची सुरुवात देखील धडाकेबाज झाली होती. शकील बदायुनी जी मुंबईमध्ये आल्यावर सर्वप्रथम फिल्म निर्माता कारदार व संगीतकार नौशाद यांना भेटायला गेले होते. त्यावेळी तुम्ही

आपल्यातील गुणवत्ता एकाच वाक्यात कशी काय सांगू शकाल असा अवघड प्रश्न त्यांना विचारण्यात आला त्यावर त्यांचे उत्तर होते, 'हम दर्द का अफसाना दुनियाको सुना देंगे, हर दिल में मोहब्बत की एक आग लगा देंगे' या त्यांच्या हजरजबाबीपणामुळे  नौशाद यांनी पटकन त्यांना 'दर्द' चित्रपटाची ऑफर दिली. उमा देवींच्या आवाजातील (म्हणजे पुढे जाऊन हास्य अभिनेत्री बनलेल्या टूनटून) 'अफसाना लिख रहीं हुं' या गाण्यामुळे शकील जी पटकन रसिकांच्या गळ्यातील ताईत बनले.

नौशाद व शकील बदायुनी ही जोडी मग खूप गाजू लागली. ‘बैजुबावरा’, ‘मदर इंडिया’, ‘गंगा जमुना’, ‘मोगल ए आजम’ असे एक से बढकर एक चित्रपट या जोडीने केलेपण त्यांना फिल्मफेअर मिळाले ते संगीतकार रवि व हेमंत कुमार यांच्यामुळे. ‘साहब, बीबी और गुलाम’, ‘बिन बादल बरसात’ (दोन्ही चित्रपट हेमंत दा यांच्या बरोबर), ‘गृहस्थी’, ‘घुंगट’, ‘दो बदन’ (सर्व चित्रपट रवि सोबत) ही नावे ऐकली कि एकाहून एक अर्थपूर्ण,रसाळ गाणी रसिकांच्या ओठावर येऊ लागतात. या सर्व गीतांचे गीतकार शकील जी होते हे काय वेगळे सांगायला हवे का?

पण नौशाद यांचे शकील यांच्यावर निस्सीम प्रेम होते. बैजू बावराच्या वेळी चित्रपट निर्माता विजय भट यांना गीतकार म्हणून कवी प्रदीपच हवे होते कारण चित्रपटामध्ये बरीच गाणी भक्ती गीते होती. पण नौशाद यांनी शकील यांचाच आग्रह धरला. पुढचा इतिहास मग सगळ्यांनाच ठावूक आहे. द्यायचे ते सर्वोत्तमच असा शकील व नौशाद या जोडीचा शिरस्ता असल्याने. 'प्यार किया तो डरना क्या, प्यार किया कोई चोरी नहीं की ' या गाण्यासाठी शकील जी यांनी तब्बल १०५ वेळा आपली लेखणी झिजविली. परफेक्शन चा इतका ध्यास घेणारा गीतकार विरळाच म्हणायचा नाही का?

आपण लिहिलेल्या शेरांवरच गाणी बेतण्याचे त्यांचे कौशल्य वादातीत होते. त्यांचा एक शेर आहे; कोई ऐ ‘शकील’ देखे ये जुनूँ नही तो और क्या है, कि उसीके हो गये हम जो न हो सका हमारा' त्यावरूनच त्यांनी दो बदन

या चित्रपटामध्ये लिहिले एक गाणे.. बोल होते, 'ये हमारी बदनसीबी जो नही तो और क्या है, कि उसीके हो गये हम जो न हो सका हमारा (रहा गर्दीशो में हरदम मेरे इश्क का सितारा). असेच दुसरे उदाहरण म्हणजे, "बदले-बदले मेरे गमख्वार नजर आते है, मरहले इश्क के दुश्वार नजर आते है" या शेर चे 'बदले-बदले मेरे सरकार नजर आते है, घर की बरबादी के आसार नजर आते है' या गाण्यात केलेले रुपांतर.

शकील बदायुनी यांची गाणी जेव्हा रेडियो वर वाजायची तेव्हा चहाच्या टपरीवर ती ऐकायला रसिकांची झुंबड उडायची. लोकांच्या या वेडाचे कारण सांगताना जलाल मुरादाबादी यांनी एका ठिकाणी म्हणून ठेवले आहे की 'शकील शायरे-फ़ितरत (स्वाभाविक कवि) है, शायरे-कारीगर नहीं' त्याचमुळे त्यांची गाणी ओघवती शैलीतील भासतात व सहज गुणगुणता देखील येतात. शकील जी यांना कधीच शब्दांची तोडफोड किंवा ओढून ताणून जुळवाजुळव करावी लागली नाही हे सांगणे जलाल मुरादाबादी यांना इथे अभिप्रेत आहे

शकील जी यांना मित्रांसोबत वेळ घालविणे फार आवडायचे, नौशाद, रफी, जॉनी वौकर या मित्रांसोबत पतंग उडवायला त्यांना खूप आवडायचे. मित्रच कशाला अगदी परक्या माणसाबद्दल पण त्यांच्या मनात आपुलकी असायची. शरद वायकूळ या जगप्रसिद्ध चित्रकाराला शकील बदायुनी यांच्या माणुसकीचा प्रत्यय तेव्हा आला जेव्हा नोकरी नसल्याने त्यांची उपासमार होत होती व भिक मागायची पाळी आली होती. एकदा शरद भिक मागत असताना त्यांची गाठ एका माणसाशी पडली, त्या माणसाने त्याला स्वतःच्या मामीच्या घरी नेले, त्याच्या रोजच्या जेवणाची सोय तर केलीच वर परत एक छानसे गीत त्याला लिहून दिले व सांगितले; हे गीत पाठ करून रोज भिक मागत जा तुला भरपूर पैसे मिळतील. व प्रत्यक्षात झाले ही अगदी तसेच. शरद यांना कालांतराने त्या माणसाची खरी ओळख कळली. ते दुसरे तिसरे कोणीही नसून आपले शकीलजीच होते

शकील जी यांनी गीत लेखनाचा स्तर इतक्या उंचीवर नेऊन ठेवला होता की भल्या भल्या लोकांना त्याची धडकी भरायची. जेव्हा चीन शी युद्धात हरल्यावर भारतीय जनतेचे मनोबल पुन्हा एकदा उंचवायचे ठरले तेव्हा

कवी प्रदीप यांना एक देशभक्तीपर गीत लिहिण्याचा आग्रह मेहबूबखान यांनी केला. पण कवी प्रदीप असे गीत लिहिण्यास टाळाटाळ करत होते. त्याचे कारण होते शकीलजी. शकीलजी यांनी 'लीडर' चित्रपटामध्ये एक सुंदर व आवेशपूर्ण देशभक्तीपर गीत लिहिले होते, ‘अपनी आज़ादी को हम हरगिज़ मिटा सकते नहीं'. आता या गीताएवढे ताकदीचे गीत आपल्याहातून लिहिले जाईल का याची किंचीतशी धास्ती कवी प्रदीप यांना होती. पण कालांतराने कवी प्रदीप यांनी 'ए मेरे वतन के लोगो' सारखे तोडीस तोड गीत लिहून दाखविलेच

२० एप्रिल, शकील बदायुनी यांचा स्मृती दिन पण त्यांची आठवण येण्यासाठी आधी ते विस्मृतीमध्ये तर जायला हवेत ना! उलट 'याद में तेरी जाग जाग के हम रातभर करवटें बदलते हैं' अशीच काहीसी स्थिती त्यांच्या चाहत्यांची सदैव असते



# मैं पल दो पल का शायर हूं

काही गीतकार असे असतात कि त्यांची हर एक रचना म्हणजे पाण्याच्या थेंबासारखी असते. कधी ती दवबिंदू सारखी सकाळ प्रसन्न करून जाणारी असते. तर कधी ती अळवावरच्या पाण्यासारखी मनात नानाविविध विभ्रम निर्माण करणारी असते. कधी त्यांची रचना आपल्या डोळ्यांमध्ये पाणी आणते तर कधी ती आपल्याला शिंपल्यामधील मौल्यवान मोतीसमान भासते. साहीर लुधियानवी हे असेच एक गीतकार आहेत.



साहीर लुधियानवी यांचे खरे नाव अब्दुल हयी होते पण ते लुधीयानाचे राहणारे असल्याने त्यांनी लुधीयानवी असे नाव धारण केले. 'आजादी कि राह पर' हा साहीर यांचा पहिला चित्रपट होता पण 'नौजवान' या चित्रपटामुळे हा तरुण गीतकार लाईम लाईट मध्ये आला. 'ठंडी हवाएँ लहराके आएँ' या गाण्यासोबत साहीर ने, माझे काव्य म्हणजे सुखद आल्हाददायक पश्चिमेचा गार वारा असेल अशी जणू खुशखबरच रसिकांना दिली

गुरुदत्तच्या 'बाजी' मधून साहीर ने आपण देखील बाजीगर आहोत हे सिद्ध केले. त्यामुळेच गुरुदत्त, सचिन दा व साहीर हे त्रिकुट प्यासा मध्ये परत एकदा एकत्र आले

साहीर यांनी सर्व प्रकारच्या गीत रचना केल्या पण त्यांच्या कव्वाल्या खास करून गाजल्या. बरसात कि रात मधील 'ये इश्क इश्क है', 'ना तो कारवां की तलाश है ना हमसफ़र की तलाश है' या रचना मास्टरपीस म्हणून गणल्या जातात. 'ऐ मेरी जो़हरा ज़बीं' ही वक्त मधील कव्वाली तर प्रत्येक लग्न समारंभातील खास पेशकश असते.

'निगाहें मिलाने को जी चाहता है' हि नूतन यांच्या अभिनयाने गाजलेली कव्वाली पण साहिरच्या लेखणीचीच कमाल होती

साहीर यांचे नाव लेखिका अमृता प्रीतम व नंतर गायिका सुधा मल्होत्रा यांच्याबरोबर जोडले गेले. पण दोन्ही वेळा त्यांच्या प्रणयकथेचा सुखान्त काही झाला नाही. पण त्यांच्या या प्रेमभावना वेळोवेळी त्यांच्या गीतामध्ये उमटल्या. गुमराह मधील रचना, 'चलो इक बार फ़िरसे अजनबी बन जाये हम दोनो' त्यांची मानसिक स्थिती दाखविणारे गाणे होते; नाही का?



गाण्याच्या यशामध्ये सूर व संगीत यांच्या पेक्षा शब्द महत्वाचे आहेत असे साहीर यांना नेहमीच वाटायचे. त्यामुळेच कि काय त्यांचे सचिन दा यांच्या बरोबरचे मधुर संबंध संपुष्टात आले. प्यासाच्या यशामध्ये सचिनदा यांच्या संगीतापेक्षा माझ्या शब्दांचा जास्त वाटा आहे असे विधान केल्यामुळे (काहींच्या मते हे साहीर यांचे मत नसून रसिकांचे म्हणणे होते) व लता ला जितके मानधन मिळते त्यापेक्षा मला एक रुपया जास्त मानधन मिळाले पाहिजे या त्यांच्या हट्टामुळे हे सर्व रामायण घडले असे म्हटले जाते

पण हेच साहीर लुधियानवी होते की ज्यांच्या मुळे ऑल इंडिया रेडिओला एखादे गाणे वाजविण्यापुर्वी गायक, गायिका, संगीतकार यांच्या बरोबरीनेच गीतकाराचे नाव उद्घोषित करण्याची प्रथा चालू करावी लागली.

गाणे मजेशीर असले कि गीतकारांना ऊटपटांग शब्द लिहिण्याचा मोह आवरता येत नाही पण असा मोह साहीर यांनी आवरलाच पण त्यांनी अशा सिच्युअशन मध्ये देखील यमक जुळवून गेयता शाबूत ठेवली. आठवून पहा प्यासामधील गाणे.. 'नौकर हो या मालिक, लीडर हो या पब्लिक; अपने आगे सभी झुके है, क्या राजा क्या सैनिक"

संगीतकारांनी आधीच ठरविलेल्या चालीसाठी आपण शब्द लिहिणार नाही किंवा एखाद्या चालीत चपखल बसत नाहीत म्हणून आपण दिलेले ओरिजिनल शब्द बदलणार नाही असा साहीर यांचा एकंदरीत तोरा असायचा. याउलट आपल्या काव्याला योग्य ते संगीत देण्याची कल्पकता संगीतकारांनी दाखवावी अशी भूमिका ते वेळोवेळी घ्यायचे. पण त्यांच्या या भूमिकेला काही सन्मानीय अपवाद होते. सचिन दा यांनी एक धून आधीच बनविली होती जी ऐकून साहीर यांनी 'ठंडी हवाएँ लहराके आएँ' हे गीत लिहिले. आणि या नंतरच सचिन दा व त्यांची जोडी जमली होती. त्याचप्रमाणे 'नया दौर' मधील 'मांग के साथ तुम्हारा' या गीताचे शब्द पण साहीर यांनी ओ पी नय्यर यांनी आधीच बनविलेल्या चालीसाठी लिहिले होते

साहीर यांच्या गीताचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे गाणे चित्रपटाची कथा पुढे घेऊन जायचे. 'संसार से भागे फिरते हो', 'तेरे प्यार का आसरा चाहता हु', ' आगे भी जाने ना तू' , 'जाने क्या तुने कही' , 'मोहब्बत बडे काम कि चीज है 'ही गाणी आठवली कि माझे म्हणणे पटेल तुम्हाला !

साहीर यांना 'ताजमहल' व 'कभी कभी' या चित्रपटांसाठी उत्कृष्ट गीतकाराचा फिल्मफ़ेअर पुरस्कार मिळाला होता. पण ताजमहाल या वास्तूबद्दल साहीर यांना फारसे कौतुक नव्हते. लीडर चित्रपटासाठी गीतकार, शकील बदायुनी यांनी ताजमहाल वर 'एक शहनशाहने बनवा के हसीन ताजमहल, सारी दुनिया को मोहब्बत की निशानी दी है' अशा ओळी लिहिल्या होत्या. त्यावर साहीर यांचे प्रत्युत्तर होते ...'एक शहनशाहने दौलत का सहारा लेकर हम गरीबोंकी मोहब्बत का उडाया है मजाक'

तल्खीयां हा त्यांचा काव्यसंग्रह खूप गाजला. तल्खीयां याचा उर्दू मध्ये अर्थ होतो कडवटपणा किंवा कटुता. साहीर यांच्या काही गीतांमध्ये ही कटुता हटकून डोकवायची. उदाहरण द्यायचे झाल्यास 'तेरी दुनिया मे जीनेसे तो बेहतर है के मर जाये' हे हाउस नंबर ४४ मधील गीत.

तदबीर से बिगड़ी हुई, तकदीर बना ले हे साहीर यांचे गाणे इतके लोकप्रिय झाले होते कि केवळ ते गाणे ऐकण्यासाठी, गावकरी जोधपुर च्या एअर फोर्स स्टेशन मध्ये यायचे अशी आठवण खुद्द देव आनंद यांनी सांगितली आहे. पण आपले संवेदनशील काव्य, नाईट क्लब मधील गाणे म्हणून वापरले गेले याचे त्यांना त्यावेळी खूप वैषम्य वाटले होते

'जां निसार अख्तर' हे 'जावेद अख्तर' यांचे वडील; साहीर व ते जिगरी दोस्त होते. पण जावेद अख्तर यांचे आपल्या वडिलांशी फारसे पटायचे नाही. त्यांचे आपापसांमध्ये वारंवार खटके उडायचे. अशावेळी जावेद अख्तर साहीर यांच्या कडे जायचे. त्यामुळे जावेद अख्तर व साहीर यांचे नाते जसे पिता- पुत्रा प्रमाणे होते त्याचप्रमाणे ते मित्रत्वाचे पण होते. साहीर यांनी 'जां निसार अख्तर' यांना हि कधी दुखावले नाही व 'जावेद अख्तर' यांना देखील. साहीर हे एका अर्थाने या पिता पुत्रामधील एक सेतू होते

साहीर यांचे कभी कभी चित्रपटातील एक गाणे आहे ....कल और आयेंगे नगमोंकी खिलती कलियाँ चुननेवाले, मुझ से बेहतर कहने वाले, तुमसे बेहतर सुनने वाले. कल कोई मुझ को याद करे, क्युं कोई मुझ को याद करे, मसरुफ जमाना मेरे लिये,क्युं वक्त अपना बर्बाद करे? . बहुदा आपल्या मागे रसिक आपल्याला विसरून जातील असे त्यांना वाटायचे. पण त्यांना काय ठावूक होते कि रसिक साहीर साठी जन्मभर असेच म्हणत राहतील ...जाने क्या तुने कही, जाने क्या मैने सुनी, बात कुछ बन ही गयी

८ मार्च साहीर यांचा जन्मदिन.. त्यांची आठवण येताना हेच गाणे ओठांवर रेंगाळते; जीवन के सफर मी राही मिलते हैं बिछड़ जाने को और दे जाते हैं यादें, तनहाई में तड़पाने को.

शेवटी साहीर यांच्या शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास 'जिस्म की मौत कोई, मौत नहीं होती है; जिस्म मिट जाने से इन्सान नहीं मर जाते' खरंच आहे ते; साहीर जरी आज आपल्यामध्ये नसले तरी त्यांच्या गीतांच्या रूपाने ते आजही आपल्या अवती भवती आहेत .

# 'पल पल दिलके पास तुम रहते हो'



राजेंद्र कृष्ण!

साहीर, मजरूह, गुलजार यांच्या प्रमाणेच दैवी प्रतिभा लाभलेले एक गीतकार होते. राजेंद्रकृष्ण म्हटले कि आठवतात सी. रामचंद्र, मदनमोहन यांच्यासारख्या संगीतकारांसोबत त्यांची गाजलेली अनेक गाणी. **'देख कबीरा रोया', 'गेटवे ऑफ इंडिया', 'जहाँआरा','अनारकली','अलबेला'** यांच्यासारखे अनेक चित्रपट त्यांच्या शब्दसंपदेमुळे रसिकांच्या हृदयावर कायमचे कोरले गेले.

'पल पल दिलके पास तुम रहते हो', 'फिर वही शाम, वही गम, वही तनहाई' 'शोला जो भडके' 'जाग दर्दे इश्क जाग' या सारखी गाणी राजेंद्र कृष्ण यांची लोकप्रियता अधोरेखित करण्यास पुरेशी आहेत.

शिमला येथे कारकूनगिरी करणारे राजेंद्रकृष्ण मुंबई मध्ये आले ते पटकथा लिहिण्यासाठी. 'जनता' ह्या चित्रपटाची पटकथा त्यांनी सर्वप्रथम लिहिली. 'जंजीर (साल १९४७)' या चित्रपटासाठी त्यांनी पहिल्यांदा गीतलेखन केले पण प्रसिद्धीचा झोत त्यांच्यावर पडला ते **'बडी बहेन'** या चित्रपटातील गीतांमुळे.

महात्मा गांधी यांच्या हत्येमुळे विचलित झालेल्या राजेंद्र कृष्ण यांनी एक गाणे लिहिले.. 'सुनो सुनो ए दुनियावालों बापू कि ये अमर कहानी'. रफी यांनी हे गाणे गायले तर हुस्नलाल भगतराम यांनी त्याचे संगीत दिले होते

गांधी हत्या असो कि आणे जाऊन नवीन पैसे चलनात येण्याची घटना असो, राजेंद्र कृष्ण यांनी आपल्या गीतांमधून वेळोवेळी बदलत्या सामाजिक घटनांवर भाष्य केले. मिस इंडिया या चित्रपटामध्ये त्यांचे एक मजेशीर गाणे आहे,'बदला जमाना, बाबा बदला जमाना'; यात १६ आणे जाऊन शंभर पैसे आल्याने, खिसा गरम झाल्याचा कसा भास होत आहे यावर मजेशीर भाष्य करण्यात आले आहे

हेमंत कुमार व राजेंद्र कृष्ण यांनी एकत्र येऊन नागीन, मिस मेरी, चंपाकली या सारख्या अनेक अजरामर कलाकृती निर्माण केल्या. हेमंतदा यांना राजेंद्रकृष्ण यांच्याकडून जेव्हा एखादे गाणे हवे असायचे तेव्हा १५ दिवस आधी ते त्यांना तशी कल्पना देत. राजेंद्रकृष्ण देखील हेमंतदा यांच्या कडे लगेच हजर होत. पण पहिले १० - १२ दिवस राजेंद्रकृष्ण नुसती मौज मस्ती करत. आज काय इथे चांगले खायला मिळते, तिथे जाऊ; तर उद्या घोड्यांच्या रेसला जाऊ असे ते हेमंतदा यांना सांगत. जसजसे दिवस जात, तसतसे हेमंत दा यांचे टेन्शन वाढत जाई. पण हेमंत दा यांनी आपल्या टेन्शनची नुसती कल्पना राजेंद्रकृष्ण यांना दिली कि अवघ्या १५ -२० मिनिटांमध्ये ते गाणे लिहून हेमंतदा यांच्या हातात ठेवत.

'हम प्यार में जलनेवालोंको चैन कहा', 'सपनेमें साजन से दो बातें, एक याद रही, एक भूल गये' 'वो भुली दास्तान लो फिर याद' सारखी अप्रतिम गाणी लताला देणारे राजेंद्रकृष्ण, शंकर जयकिशन यांच्या नजरेत भरले नसते तर नवलच. कॉलेज गर्ल साठी जेव्हा शैलेन्द्रला डावलून एस जे यांनी राजेंद्रकृष्ण यांना पसंती दिली तेव्हा शैलेंद्र भलतेच नाराज झाले होते. शेवटी राज कपूरला शैलेंद्र व एस जे मध्ये मध्यस्थी करावी लागली होती. तात्पर्य काय राजेंद्रकृष्ण यांचे गारुड भल्याभल्यांना नाकारणे कठीण जायचे

या उलट राजेंद्र कृष्ण हे जरी उत्तम गीतकार होते तरी ओ पी नय्यर यांनी लता प्रमाणेच त्यांनाही दूर ठेवले होते. त्यामुळे या दोघांचे कॉम्बिनेशन आपल्याला हिंदी चित्रपटसंगीतामध्ये आढळत नाही.

राजेंद्र कृष्ण हे फक्त गीतकारच नव्हते तर संवाद लेखक पण होते. नागीन, पूजा के फुल, भरोसा, बॉम्बे टु गोवा अशा अनेक चित्रपटांचे संवाद त्यांचे होते. राजेंद्र कृष्ण यांना 'खानदान' चित्रपटामधील गाण्यांसाठी फिल्मफेअर

मिळाले व ते गाणे होते, 'तुम्ही मेरे मंदिर, तुम्ही मेरी पूजा' 'धीरे से आजा रे अखियन में निंदिया' हि हिंदी चित्रपट संगीतातील सर्वोत्तम अंगाई म्हणून ओळखली जाते. या अंगाईचे बोल होते राजेंद्र कृष्ण यांचे. पण त्यांनी 'मेरे भोले बलम (मेरी प्यारी बिंदू)**, ओ बेटाजी,** किस्मत की हवा कभी नरम कभी गरम' व या सारखी अनेक मजेशीर, विनोदी गाणी देखील तितक्याच सहजतेने लिहिली

राजेंद्र कृष्ण हे जितके अप्रतिम गीतकार होते त्यापेक्षा ही फार महान व्यक्ती होते. गुलजार यांना त्यांच्या उमेदीच्या काळात भाडेकरू म्हणून राजेंद्र कृष्ण यांनीच आसरा दिला होता. भगवान दादा यांच्या पडत्या काळात ज्या मोजक्या व्यक्तींनी त्यांची साथ सोडली नव्हती त्यात त्यांचे नाव फार वरती होते. ज्युबिली कुमार, राजेंद्र कुमार ला मदतीचा पहिला हात दिला होता तो याच राजेंद्र कृष्ण यांनी. एच एस रवैल यांच्याकडे प्रतिमाह १५० रुपयाची सहाय्यक निर्देशकची नोकरी राजेंद्र कुमार यांना लावली ती राजेंद्र कृष्ण यांनीच

राजेंद्र कृष्ण यांना घोड्यांच्या रेस चा खूप नाद होता. त्यांनी रेस वर खूप पैसे उधळले पण त्यांना एकदा चक्क ४६ लाखाचा जेकपोट देखील लागला होता. राजेंद्र कृष्ण यांना तामिळ भाषेचे उत्तम ज्ञान होते. म्हणूनच 'AVM' स्टुडियो त्यांनी तब्बल १८ तामिळ स्क्रिप्ट्स लिहिली होती. राजेंद्र कृष्ण यांच्या व्यक्तीमत्वाला असे अनेक पैलू होते



६ जून; राजेंद्र कृष्ण यांचा जन्मदिवस. रसिकांतर्फे त्यांच्या आत्म्यास एवढेच सांगावेसे वाटते की 'फिर वही शाम, वही गम, वही तनहाई है दिल को समझाने तेरी याद चली आयी है'

# ꧁ 'ना रहे हम... मेहेका करेंगे, बनके कली ..... ꧂



मजरुह सुलतानपुरी ....

असे एक गीतकार कि ज्यांचे नाव आठवले कि रसिक एक वेगळ्याच विश्वात विहरू लागतात. मजरूह म्हणजे प्रेमाचा अविष्कार, मजरुह म्हणजे तरुणाईची स्पंदने; मजरूह म्हणजे गझल्स ची मेजवानी, मजरूह म्हणजे अवखळ , अल्लड शब्दांची बरसात करणारा जादुगार.

मजरूह साहेबांची अशी कितीतरी रूपे रसिकांच्या डोळ्यासमोर फेर धरू लागतात. याला कारण म्हणजे त्यांच्या सिद्ध हस्त लेखणीतून उतरलेली 'बाबूजी धीरे चलना, प्यार में जरा संभलना', 'अच्छा जी मै हारी चलो मान जाओ ना', 'लाखों हैं निगाहों में जिंदगी की राह में', 'छूपा लो यूँ दिल में प्यार मेरा', ' पापा कहते हैं बडा नाम करेगा', 'पहला नशा पहेला खुमार' 'जलते है जिस के लिये, तेरी आंखो के दिये ढूंढ लाया हू वही, गीत मै तेरे लिये' या सारखी असंख्य सदाबहार गाणी

'पांच रूपैया बारह आना', किंवा 'सी ए टी कैट, कैट माने बिल्ली, दिल है तेरे पंजे में तो क्या हुआ' सारखी अवखळ गीते असोत कि 'हम है मतां-ए-कुचा ओ, बाजार की तरह उठती है हर निगाह, खरीदार की तरह' किंवा 'रस्मे उल्फत को निभाये' सारखी गंभीर आशयप्रधान गझल..... मजरूह म्हणजे एका बाजूस ओठावर हसू व दुसरी कडे काळजात दुखः देणारे व्यक्तिमत्व होते

हकीम म्हणून व्यवसाय करणारे मजरूह, गीतांच्या मायावी दुनियेमध्ये आले ते जिगर मुरादाबादी यांच्या मुळे. जिगर मुरादाबादी यांना त्यांच्या अखेरच्या काळात प्रश्न विचारण्यात आला कि जगाला तुम्ही शायरी दिली हे सर्वांनाच ठावूक आहे. पण त्या व्यतिरिक्त आपले दुसरे योगदान सांगायचे झाल्यास आपण काय सांगाल? त्यावर त्यांचे उत्तर होते मजरुह सुलतानपुरी; मी जगाला मजरूह सारखे रत्न पारखून दिले आहे

असरार उल हसन खान यांचे मजरूह मध्ये रुपांतर करण्यात नौशाद यांचे हि खूप योगदान आहे. फिल्म शाहजहां मधून मजरूह यांचे हिंदी चित्रपट सृष्टीमध्ये पदार्पण झाले. त्यांच्या गीतांना संगीत लाभले ते नौशाद यांचे तर सूर लाभले ते साक्षात सेहगल यांचे. मजरूह यांचे एक गाणे .... 'जब दिल हि टूट गया' सेहगल यांना एवढे आवडले कि माझ्या अन्त्य यात्रेला हेच गाणे वाजवावे अशी त्यांची अंतिम इच्छा होती

पहिल्याच प्रयत्नामध्ये प्रशंसा मिळाल्यावर देखील मजरूह यांना पुढची काही वर्षे कठीण गेली. डाव्या विचारसरणी मुळे मजरुह यांना काही काळ तुरुंगवास भोगावा लागला. तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक हालत खूप वाईट झाली होती. स्वाभिमानी मजरुह आपली मदत फुकट स्वीकारणार नाही हे ओळखून राज कपूर ने त्यांना एक गाणे लिहिण्यास सांगितले. इक दिन बिक जायेगा माटी के मोल' हे गाणे राज कपूर यांनी त्याकाळी तब्बल हजार रुपये देऊन खरेदी केले व मजरुह साहेब यांना त्यांचे मोल माती समान नसून सोन्यासमान असल्याचे आपल्या कृतीद्वारे दाखवून दिले

उर्दू गीतकार , गझलकार म्हणून मजरूह यांना आपली ओळख असावी असे मनोमन वाटायचे पण संसाराचा गाडा चालविण्यासाठी त्यांनी हिंदी चित्रपट गीते लिहिण्याचे ठरविले. ते नेहमी म्हणत की, 'फ़िल्म गीत रोटी देता है मगर शायरी सुकून देती है।'

पण केवळ पोट भरण्यासाठी म्हणून त्यांनी कधी पाट्या टाकण्याचे काम केले नाही कि खालच्या पातळीवर जाऊन द्विअर्थि, वाह्यात, सवंग शब्द रचना केल्या नाहीत. त्यांचे मोठे पण यातच आहे कि सी.आय्.डी., तुमसां नहीं देखा, पेईंग गेस्ट, सुजाता, चलती का नाम गाडी, चायना टाऊन, फिर वोही दिल लाया हुं, दोस्ती,

मेरे सनम, तिसरी मंझील, ज्वेल थिफ, दस्तक, कारवाँ, अभिमान – हे त्यांचे असे काही चित्रपट आहेत ज्यातली सर्वच्या सर्व गाणी लोकप्रिय झाली. एखाद्या गीतकाराची एका चित्रपटातली सर्वच गाणी लोकप्रिय होण्याच्या बाबतीतला हा रेकॉर्ड आहे; जो आजपर्यंत अबाधित आहे.

संगीतकाराने आधीच तयार केलेल्या चालींवर गीतलेखन करण्यात त्यांचा हातखंडा होता.

ख़ुमार बाराबंकवी, शकील बदायूंनी, साहिर लुधियानवी, कैफ़ी आज़मी, अली सरदार जाफ़री, राजेन्द्र कृष्ण असे शुद्ध व्याकरणयुक्त गीते लिहिणारे, मजरुह यांचे मित्र नेहमी त्यांची चेष्टा करायचे कि हे काय तू 'सी ए टी कैट, कैट माने बिल्ली' सारखे उटपटांग लिहितोस. तेव्हा मजरूह म्हणायचे कि हे गीत किशोर सारख्या उछलकुद करणाऱ्या अभिनेत्यासाठी आहे व सिच्युअशन ला न्याय देणारे ही आहे. वर ते साहिर यांची फिरकी घेण्यास हि मागे पुढे पाहत नसत. ते पलटवार करत कि साहीर तू तर माळ्याच्या तोंडी देखील गझल घालशील. चलती का नाम गाडी मध्ये मेकेनिक असलेल्या किशोर च्या तोंडी 'पांच रूपैया बारह आना' असेच बोल शोभून दिसणार असे हि खडसवायला ते मागे पुढे पाहत नसत

पण गझल व शायरीच्या बाबतीत देखील मजरुह तितकेच माहीर होते. ध्येयवेड्या माणसाची सुरुवात नेहमी एकटीच होते पण कालांतराने त्याची मते पटल्यावर त्याच्या पाठी अनुयायी लोकांची गर्दी जमते हे दर्शविण्यासाठी वापरण्यात येणारी लोकप्रिय ओळ ... 'मै अकेला ही चला था जानिबे मंजिल, मगर लोग पास आते गये और कारवां बनता गया' म्हणजे आपल्या मजरुह यांचीच देणगी आहे

प्रसिद्ध शायर मजरुह सुलतानपुरी असं सांगतात, की गझल मधील शेर हा आपला अर्थ कधीच सांगत नाही तर तो केवळ अर्थाची दिशा दाखवितो.. आणि या अर्थाच्या दिशा तरी किती?.. तर ऐकणाऱ्याच्या आयुष्यातील अनुभव जसे, तसे हे अर्थ आपली दिशा बदलतात

मजरूह यांच्या गझल मधील शेर जसे दिशा दर्शक होते तद्वत मजरुह स्वतः देखील अनेक संगीतकारांसाठी दिशा दर्शक होते. तिसरी मंझील साठी राहुल देव यांचे नाव नसीर हुसेन यांना सुचविले ते मजरुह यांनीच. ज्या प्रमाणे त्यांनी आपल्या आर डी ला यशाची दिशा दाखवली त्याच प्रमाणे लक्ष्मीकांत प्यारेलाल यांना देखील यशाची वाट दाखविली ती दोस्ती साठी अजरामर गीते लिहून

मजरूह यांच्या दैदिप्यमान कारकिर्दीला झळाळी मिळाली ते दादा साहेब फाळके पुरस्कारामुळे. हा पुरस्कार मिळविणारे ते पहिले गीतकार ठरले यातच त्यांचे अलौकिक स्थान अधोरेखित होते

२४ मे या गीतकाराचा स्मृतिदिन ... पण त्यांची आठवण हि तारखेची मोहताज नाही. मजरुह यांच्याच शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास, ते नेहमीच रसिकांना आपली आठवण करून देत रहात असतात..... रहे ना रहे हम... मेहेका करेंगे, बनके कली बनके सबा



## जब कभी भी सुनोगे गीत मेरे



तुम मुझे यूँ भुला ना पाओगे,
जब कभी भी सुनोगे गीत मेरे,
संग संग तुम भी गुनगुनाओगे

हसरत जयपुरी; हिंदी चित्रपट संगीतामधील एक सुवर्ण अध्याय! इक्बाल हुसेन म्हणून जन्मलेल्या या अवलियाने त्याच्या जन्मस्थानावरून स्वतःचे नाव हसरत जयपुरी ठेवले. हसरत जयपुरी स्वतः ला प्रेमदूत समजत. प्रेमाला जात पात, धर्म या सर्वांचे बंधन नसते हे ते स्वानुभवावरून जाणून होते. वीस वर्षाचे असताना ते एका हिंदू मुलीच्या, राधेच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. तिच्यासाठीच त्यांनी लिहिली होती कविता..'ये मेरा प्रेम पत्र पढकर के तुम नाराज न होना'. ही कविता कधी त्यांच्या प्रेयसीच्या हातात पडलीच नाही पण जेव्हा ती राज कपूरच्या हातात पडली. तेव्हा त्याचे एक अजरामर गीत झाले; चित्रपट होता 'संगम'.

खरे तर हसरत जयपुरी नावाच्या लोखंडाला परीसस्पर्श झाला तो कपूर खानदानाचाच. मुंबई मध्ये बस कंडक्टर म्हणून काम करणाऱ्या हसरत साहेबांवर एक दिवस पृथ्वीराज कपूर यांची नजर गेली. पृथ्वीराज यांनी एका मुशायरामध्ये हसरत जयपुरी यांना ऐकले व लगेच त्यांचे नाव आपल्या मुलाला राज ला सुचविले. राज कपूरच्या 'बरसात' चित्रपटासाठी सर्वप्रथम हसरत जी यांचे अमृत बोल बरसले. गाणे होते, "जिया बेकरार है" या पहिल्या वहिल्या गाण्याची जन्म कथा पण तितकीच रोचक आहे. राज यांच्या सांगण्यावरूनच शंकर जयकिशन यांनी एक धून हसरतजीना ऐकवली. गाण्याचे बोल होते.. अंबुआ का पेड है वहीं मुंडेर है, आजा मेरे बालमा काहे की देर है. या वरूनच

मग हसरतजी ना सुचले; जिया बेकरार है, छाई बहार है, आजा मेरे बालमा, तेरा इंतजार है। हसरत जयपुरी यांनी नेहमीच आपल्याला आलेल्या अनुभवांवरून गीते रचली. आपल्या जयपूर मधील मित्रांनी आग्रह केल्यामुळेच हसरतजी मुंबईला नशीब आजमावयाला आले. त्यांच्या या उपकारांची फेड करण्यासाठी त्यांनी एक गीत लिहिले, ' एहसान मेरे दिल पे तुम्हारा है दोस्तों, ये दिल तुम्हारे प्यार का मारा है दोस्तो'

तुम्हाला आश्चर्य वाटेल कि आपल्या अपत्याच्या बाल लीला पाहून सुचलेले गाणे हसरत जी यांनी प्रणयगीत म्हणून एका सिच्युएशन मध्ये चपखल बसविले. गाणे होते,"तेरी प्यारी प्यारी सुरत को किसीकी नजर ना लागे चष्मेबद्दूर" अशीच एक मनोरंजक कहाणी आहे ते त्यांच्या 'बदनपे सितारे लपेटे हुए, ए जाने तमन्ना किधर जा रही हो' या गाण्याविषयी. आरजू चित्रपटाच्या लंडन येथे होणाऱ्या प्रिमियर साठी हसरत जी व जयकिशन युरोप मध्ये गेले होते. पॅरिस ची सैर करत असताना हे दोघे जण लिडो नावाच्या नाट्यगृहात गेले. तिथे नर्तिका चमचमत्या ताऱ्यांच्या ड्रेस मध्ये नृत्य करत होत्या. नाचताना स्वाभाविकपणे काही टिकल्या ड्रेस वरून गळून खाली पडत होत्या. हे बघून जयकिशन ने हसरतजी ना या दृश्यावर चार ओळी मनात आठवून ठेवा असे सांगितले. हसरतजी यांनी ती सूचना मनावर घेऊन प्रिन्स चित्रपटातील हे गाणे लिहिले 'गम उठाने के लिये मैं तो जिये जाऊँगा, साँस की लय पे तेरा नाम लिये जाऊँगा' या ओळी देखील त्यांना सुचल्या होत्या ते घरी उशिरा आल्यामुळे तोंड फुगवून, रुसून बसलेल्या आपल्या बायकोला पाहूनच

हसरत जी यांची अनेक गीते लोकप्रिय आहेत पण त्यांना मानाचा फिल्म फ़ेअर पुरस्कार मिळाला ते 'बहारों फुल बरसाओ, मेरा मेहबूब आया है' व 'जिंदगी एक सफर है सुहाना' या गाण्यांसाठी

हसरत जी मशहूर होते ते चित्रपटांचे शीर्षक गीत लिहिण्यासाठी. दिल एक मंदिर है (दिल एक मंदिर), रात और दिन दीया जले (रात और दिन), इक घर बनाऊंगा, तेरे घर के सामने (तेरे घर के सामने), अरे ऐसा मोका फिर कहा मिलेगा ..एन इवनिंग इन पेरिस (एन इवनिंग इन पेरिस), गुमनाम है कोई, बदनाम है कोई (गुमनाम); ही गाण्यांची यादी फक्त या गोष्टीची झलक देण्यासाठीच

शैलेंद्र , हसरत जयपुरी, राजकपूर, शंकर जयकिशन ही चौकडी म्हणजे सूर व स्वर यांचे अनोखे कॉम्बिनेशन होते. खरे तर शैलेंद्र व हसरत दोघेही गीतकार म्हणजे एकमेकांचे स्पर्धक पण दोघही जण जीवश्चकंठश्च मित्र. म्हणूनच जेव्हा शैलेंद्र ने निर्माता म्हणून 'तिसरी कसम' चित्रपट काढला तेव्हा शैलेंद्रने गीत लेखनाची अंशतः जबाबदारी हसरत जी यांच्यावर सोपवली. 'दुनिया बनाने वाले' व 'मारे गये गुलफाम' या रचना या शैलेन्द्रच्या नसून हसरत जी यांच्या आहेत

'जाने कहां गए वो दिन , कहते थे तेरी राह में' हे हसरत जी यांचे अजून एक प्रसिद्ध गाणे. बरसात चित्रपटाच्या वेळी बैकग्राउंड म्युझिक देताना राज कपूर यांना त्यातील एक पीस खूप आवडला होता. त्या पीसवर आधारित एखादे गाणे असावे असे त्यांच्या मनात खूप आधी पासून होते. त्यांनी ही इच्छा हसरत जी यांनी मेरा नाम जोकर च्या वेळी पूर्ण केली

राजकपूर यांना ठावूक होते कि आपल्या अतृप्त इच्छा फक्त हसरतजीच पूर्ण करू शकतील म्हणून संगम चित्रपटाच्या वेळी आपल्याला आवडलेल्या ' आय लव यु' ह्या गाण्याच्या चालीवर एक नवीन गीत 'राम तेरी गंगा मैली' च्या वेळी असावे हे जेव्हा राज यांनी हसरत जी सांगितले तेव्हा त्यांनी लगेच एक अविस्मरणीय गीत लिहिले, 'सुन साहेबा सुन'

इतकी सुंदर गाणी लिहून देखील हा बेदर्द जमाना आपल्याला विसरेल कि काय या शंकेने त्यांनी एक गाणे लिहिले,"तुम मुझे यूँ भुला ना पाओगे". त्यांचे हे गाणे 'पगला कही का' या चित्रपटामध्ये आहे. रसिक हसरतजीना एवढेच म्हणू शकतील की,"हसरत जी आम्ही एवढे हि काही वेडे नाही आहोत कि आपले अमुल्य योगदान आम्ही काळाच्या ओघात विसरून जाऊ"

'एप्रिल फुल बनाया तो उनको गुस्सा आया' असे मस्त गीत रचणाऱ्या हसरत जी यांचा जन्म दिन पंधरा एप्रिल चा. आपल्यापासून खूप दूर गेलेल्या हसरतजी आठवून त्यांची एखादी निस्सीम चाहती नकळत म्हणून जाईल, 'पंख होती तो उड आती रे, रसिया ओ जालिमा'

# अंजाम-ए-महफ़िल

असं एखादं छानसं पुस्तक वाचून संपताना आपली " अभी न जाओ छोडकर- के दिल अभी भरा नहीं " अशी अवस्था होतेच. पण प्रत्येक मैफ़लीची सांगता होतेच. याही महफ़िलीची सांगता 'फ़िर मिलेंगे' च्या नोटवर होत आहे. ही मैफ़ल तुम्हाला कशी वाटली ते prashant.dandekar@rediffmail.com किंवा esahity@gmail.com वर कळवा. आपल्या प्रतिक्रियांवरूनच पुढल्या मैफ़लीची आखणी सुरू होईल. अशा एक से एक दिग्गजांची मैफ़ल रंगवू. सारे काही आपल्या वाचकांच्या प्रतिक्रिया आणि फ़र्माईशींवर अवलंबून राहील. तेव्हा आपल्या प्रतिक्रिया लवकर येऊ द्यात. फ़ेसबुकवर esahity च्या पेजवर किंवा प्रोफ़ाईलवरही आपण आपल्या प्रतिक्रिया नोंदवू शकता.

**ई साहित्य प्रतिष्ठान** हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. हिंमते मर्दा. मददे खुदा. किंवा हल्लीच्या भाषेत सांगायचं तर सच्ची लगन हो तो अपने सपने हासिल करनेके लिये सारी कायनात एक हो जाती है. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. या आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत. आजचे हे पुस्तक वाचल्यावर तुम्हाला ते जाणवेलच. पण आम्ही समाधानी नाही. बारा कोटींच्या या मराठी समाजात किमान एक दोन कोटी तरी समंजस,

चोखंदळ वाचक असायला हवेत. ज्ञानोबा तुकोबांच्या संस्कारांत वाढलेल्या या समाजाकडून एवढी अपेक्षा ठेवायला काय हरकत आहे? मित्रहो. ज्योतीने ज्योत तेवत जावी. तसे वाचकांनीच वाचक जोडायला हवेत. तुम्हाला जर हे स्वप्न पूर्ण होण्यात हातभार लावावासा वाटत असेल तर फ़क्त एवढेच करा. आपल्या ओळखीपाळखीतल्या किमान दहावीस लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.
असे ई मेल आय डी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही VIP वाचक दर्जा देतो.

आमचा पत्ता : esahity@gmail.com
अधिक माहितीसाठी भेट द्या : www.esahity.com

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान